1 September 2026

To,	To,
Corporate Relations Department **BSE Limited** DCS – CRD Phiroze Jeejeebhoy Towers, Dalal Street, Mumbai 400 001	Corporate Listing Department **National Stock Exchange of India Ltd** Exchange Plaza, 5th Floor Plot No.C-1, G Block Bandra-Kurla Complex, Bandra (East), Mumbai 400 051
BSE Code: 500490	**NSE Code: BAJAJHLDNG**

Dear Sir/Madam,

Sub.: Intimation of shifting of Registered Office of Bajaj Holdings & Investment Limited (the 'Company')

We wish to inform you that the Registered Office of the Company has been shifted from "**MUMBAI PUNE ROADAKURDI, PUNE, Maharashtra, India, 411035**" to **6th Floor, Bajaj Finserv House, Off Pune – Ahmednagar Road, Viman Nagar, Pune – 411014**, with effect from 1 September 2026.

Further, the newspaper advertisement published today in this regard, is enclosed herewith.

Kindly take the same on record.

Thanking you,

For Bajaj Holdings & Investment Limited

SAURABH SURENDRA ERANDE

Digitally signed by SAURABH SURENDRA ERANDE
Date: 2026.09.01 16:45:23 +05'30'

Saurabh Erande

Company Secretary

Email ID: investors@bhil.in

राज्यात २ कोटी ६ लाख मतदारांची नावे वगळली!

(पान १ वरुन)

या प्रक्रियेतील नव्या वेळापत्रकानुसार राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने काल प्रारुप मतदार यादी जाहीर केली आहे. मागच्या निवडणुकीसाठी वापरण्यात आलेल्या मतदार यादीतील तब्बल २ कोटी ६ लाख ८८ हजार ४८७ मतदारांची नावे नव्या प्रारुप यादीतून वगळण्यात आली आहेत. एसआयआरपूर्वी ९ कोटी ७८ लाख ५४ हजार ४९ मतदार होते. एसआयआर प्रक्रियेनंतर प्रारुप यादीतील मतदारांची संख्या ७ कोटी ७१ लाख ६५ हजार ५६२ झाली आहे. यामध्ये पुरुष मतदारांची संख्या ३ कोटी ९५ लाख ८९ हजार ९०५ इतकी आहे. तर, स्त्री मतदारांची संख्या ३ कोटी ७५ लाख ७२ हजार ५७० इतकी आहे. मतदार यादीतून दोन कोटी सहा लाख मतदार विविध कारणांमुळे वगळले गेले आहेत. त्यात मतदार यादीत देण्यात आलेल्या निवासाच्या पत्त्यावर मतदार आढळून न येणे, त्या ठिकाणावरून अन्यत्र स्थलांतरित झालेले असणे, मतदाराचा मृत्यु झालेला असणे, अन्यत्र नोंदणी झाल्याने दुबार नाव येणे, गणना फॉर्म भरून देण्यास नकार देणे आदी कारणांमुळे ही नावे वगळण्यात आल्याचे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाच्या प्रसिद्धी पत्रकात स्पष्ट केले आहे.

सीजेपीच्या आंदोलनामागील शक्ती ओळखा

(पान १ वरुन)

सीजेपीसारख्या संघटनांचा उल्लेख करताना फडणवीस यांनी त्यांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करण्याचे आवाहन कार्यकर्त्यांना केले. सीजेपी ही केवळ काही तरुणांची संघटना नसून, तिच्यामागे मोठे जाळे काम करत असल्याचे समजून घेतले पाहिजे, असा दावा त्यांनी केला. विरोधक किंवा विविध संघटनांकडून मांडल्या जाणाऱ्या भूमिकेला भावनिक पद्धतीने नव्हे, तर तथ्यांच्या आधारे उत्तर देण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. सोशल मीडिया आणि डिजिटल माध्यमांमध्ये निर्माण होणाऱ्या नॅरेटिव्हला वेळीच प्रत्युत्तर देण्यासाठी भाजपच्या कार्यकर्त्यांनी सज्ज राहावे, असे आवाहनही त्यांनी केले.

दोन कोटी तरुणांपैकी दहा लाख युवा वॉरियर्स

महाराष्ट्रातील १८ ते २६ वयोगटातील सुमारे दोन कोटी तरुणांपैकी किमान दहा लाख तरुण-तरुणींना भाजप युवा मोर्चाशी जोडण्याचे लक्ष्य असल्याचे बैठकीत सांगण्यात आले. तरुणांपर्यंत पोहोचण्यासाठी डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी कार्यकर्त्यांना दिल्या.

'छात्रों की गूँज'मुळे भाजपला धडकी

(पान १ वरुन)

१२-१३ वर्षे सत्तेत बसूनही जनतेचे प्रश्न सोडवता येत नाहीत आणि विरोधी पक्षाला प्रश्न विचारत आहेत, असेही सपकाळ म्हणाले.

महिला आरक्षणाआडून मतदारसंघ फेररचना विधेयकाचा डाव

महिला आरक्षण विधेयकाला काँग्रेस पक्ष विरोध करत आहे, हा फडणवीस यांचा आरोप धादांत खोटा व हास्यास्पद आहे. महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ३३ टक्के आरक्षण देणारा काँग्रेस हाच पहिला पक्ष आहे व विधानसभा व लोकसभेतही ३३ टक्के आरक्षण द्यावे, ही मागणी सोनिया गांधी यांनीच लावून धरली होती. पण, भाजपाने सुरुवातीला त्याकडे दुर्लक्ष केले. आता फडणवीस व भाजप हे काँग्रेस व विरोधकांना महिला विरोधी ठरवत आहेत. महिला आरक्षण विधेयकाला कोणाचाच विरोध नाही, विरोध आहे तो भाजपच्या मानसिकतेला. कारण भाजपला महिला आरक्षण नाही तर मतदारसंघ फेररचना विधेयक मंजूर करून देशाचे दक्षिण व उत्तर असे दोन तुकडे करायचे आहेत, असा आरोपही केला.

अल्पवयीन मुलीवर सामूहिक अत्याचार

(पान १ वरुन) पीडित मुलगी उत्तर प्रदेशातील मैनपुरी येथील आहे. आई रागावल्याने ती कोणालाही न सांगता नोएडामध्ये राहणाऱ्या तिच्या चुलत भावाकडे जाण्यासाठी निघाली. मात्र, मुसळधार पाऊस आणि अंधार असल्याने गोंधळून ती परी चौक इथे उतरली. चुकीच्या ठिकाणी उतरल्याचे लक्षात आल्यावर ती घाबरली. त्याच वेळी तिथून जाणाऱ्या एका खासगी स्लिपर बसला तिने हात दाखवला. चालकाने सेक्टर ६३ कडे जात असल्याचे सांगून तिला आत घेतले. संपूर्ण बस पूर्णपणे रिकामी होती. बस परी चौकातून पुढे निघाल्यानंतर तिच्यावर वाहक आणि चालकाने धावत्या बसमध्ये सामूहिक अत्याचार केला. परी चौक ते कश्मिरी गेट या ४७ किलोमीटरच्या प्रवासादरम्यान हा घृणास्पद प्रकार घडला. अत्याचारानंतर आरोपींनी उशिरा रात्री कश्मिरी गेट बस स्थानकाजवळ पीडितेला गंभीर जखमी अवस्थेत सोडून पळ काढला. त्यानंतर पीडितेने कश्मिरी गेट पोलिस ठाण्यात धाव घेतली आणि घडलेला प्रकार सांगितला. पोलिसांनी तात्काळ तिच्या वैद्यकीय तपासणीची व्यवस्था केली आणि दंडाधिकाऱ्यांसमोर तिचा जबाब नोंदवला. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करून बस पार्किंगमधून दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले.

महाराष्ट्रातील नागरिक परतीच्या प्रतीक्षेत

(पान १ वरुन) दरम्यान, भारतीय नागरिकांची यादी परराष्ट्र मंत्रालयाकडून प्राप्त झाली असून तिची तपासणी करून संबंधितांशी संपर्क साधला जात आहे. राज्य सरकारच्या आपत्कालीन यंत्रणेकडून अडकलेल्या नागरिकांची माहिती जिल्हानिहाय तपासली जात असून, प्रवासी संस्था आणि कुटुंबीयांच्या हेल्पलाइनद्वारे सातत्याने संपर्क ठेवण्यात येत आहे. अडकलेल्या नागरिकांच्या नातेवाईकांनी प्रशासनाशी संपर्क साधावा आणि उपलब्ध माहिती तातडीने शेअर करावी, असे आवाहन राज्य आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेकडून करण्यात आले आहे. २६ ते ३१ ऑगस्टदरम्यान महाराष्ट्रातील नागरिकांच्या परतीसाठी विविध मार्गांचा वापर करण्यात आला. नागपूरमार्गे १०५, मुंबईमार्गे ३७ आणि आणखी २ नागरिक अशा एकूण १४४ नागरिकांनी भारतात प्रवेश केला आहे. सध्या २६२ नागरिक नेपाळ आणि चीनमध्ये असल्याची नोंद आहे.

केसरी शब्दकोडे क्र. १७१

आडवे शब्द – १) या स्वर्गीय प्राण्याची तुलना शामभटाच्या तट्टाणीशी करतात ४) ऐसपैस, सैल ८) मनात कपट ठेवून वरवर गोड बोलणारा ११) मलशुद्धी करणारे १३) डोके, मुख्य १४) सुपारीचे झाड १५) महात्मा गांधींचे टोपणनाव १६) जे नाही ते आहे व जे आहे ते नाही दाखवणारा १७) शास्त्राचा घाव २२) टोचताना, ठुसठुसताना होणारा आवाज २४) बेचव २६) अंथरूण, बैठक २७) श्रीमंत २८) गोडी, आवड २९) पलीकडच्या बाजूस ३३) पुन्हा मने जुळणे ३५) गवंड्याचे एक हत्यार ३६) निर्भयतेची खात्री ३८) उज्जैन नगरी ४१) एक ज्योतिषविद्या ४२) नवरी ४३) चालवणारा ४५) लहान मोठे काम ४९) सरकारविरुद्ध उठावणी ५०) प्रयत्न, जोर ५१) बाण ५२) पोळ ५४) कुटुंबनियोजनाची एक प्रकारची शस्त्रक्रिया ५५) टपाल ५७) अहंकार ५८) कप वगैरे धरण्यासाठी केलेला भाग ६०) अदलाबदल ६२) स्वयंपाकी ६४) गुरांसाठी बांधलेला हौद ६५) एक प्रकारचे हरीण ६६) एक प्रकारची पालेभाजी ६७) लहान वाडगा ६८) खोटे ६९) एकसारख्या येरझाऱ्या ७०) पुरे ७२) नाजूक जागा, मर्म ७३) वेड ७५) अधिकाराची जागा ७७) गुळाची ढेप ८१) प्रारब्ध ८३) निंदा ८४) म्हणजे पिस्ते, बदाम, अक्रोड वगैरे ८६) धडधडीत, उघडउघड ८७) बूड ८८) सभोवार ८९) एक पक्षी.

उभे शब्द – १) भपकेदार, तोरा मिरवणारा २) व्रत ३) कमी शक्तीने अवघड काम करून घेण्याची यांत्रिकी युक्ती ५) घागर ६) विस्तारीत ७) सदन ८) बेताचा, मध्यम ९) घरात पाणी आणणारे एक साधन १०) शौर्य, वीरता १२) शहरातील जुना भाग १८) बांधेसूद, आकारबद्ध १९) नवऱ्याचा भाऊ २०) तसे होवो असा आशीर्वाद २१) गळ्यात घालायची एक मंतरलेली वस्तू २३) खड्डा, खळगा २४) कमळ २५) एक बाब २९) मेणा ३०) सवडीप्रमाणे, फुरसतीप्रमाणे ३१) शेतीचे एक अवजार ३२) स्वस्त ३४) माया ३७) एक शब्दालंकार ३९) खांद्यावरून सामान वाहण्याचे एक साधन ४०) अविश्वास, खात्री नसणे ४३) उनाड, चहाटळ ४४) ताकाचे एक कालवण ४६) थकवा, ग्लानी ४७) एक धान्य ४८) चावा घेणे ४९) जेलर ५०) डोळा ५३) समृद्धी, विपुलता ५५) बुद्धिबळ खेळण्याचे वस्त्र ५६) वाणी ५९) नूतन ६१) धाटणी ६२) पिळदार ६३) दोरा गुंडाळण्याचे साधन ६४) हाक ६५) एक प्रकारचा सुंभ ६६) चटणी वाटण्याचा दगड ६८) मालमत्ता ६९) खंत ७१) मोत्याची माळ ७४) निश्चितपणे ७५) नवरा ७६) एक सुवासिक फुलझाड ७८) सर्पांचा राजा ७९) खांद्याचा सांधा ८०) तारांबळ ८२) आकडा ८३) होडी ८५) वेळ, समय.



शब्दकोडे क्र. १७० चे उत्तर